


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ५, अंक १ जानेवारी २०२४ (क्र.१६)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

बिबट्या, वाघ आणि आता हत्ती

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ४

ताडोबा अंधारीत ९३ वाघ; प्रकल्पातील व्याघ्र अधिवासाची वहन क्षमता संपुष्टात

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी प्रायोगिक तत्त्वावर बॅटरीवर चालणारी चार वाहने

'चला माझ्या ताडोबाला' उपक्रमांतर्गत यंदा बफर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना ताडोबा सफारी

तानसा वन्यजीव अभयारण्य ५

गारगाई प्रकल्पासाठी तानसा अभयारण्यातील ७०० हेक्टर जमीन; लाखो झाडे तोडणार

तानसा अभयारण्यात पक्षी सप्ताहात १५८ प्रजातींची नोंद

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ६

नवेगाव नागझिऱ्यात ब्रह्मपुरीतून आणखी तीन वाघ सोडण्याची तयारी

नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्य ७

नांदुरमधमेश्वर अभयारण्यात नोव्हेंबरमध्ये स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन

बोर व्याघ्र प्रकल्प ७

बोर व्याघ्र प्रकल्पात व्याघ्रदर्शनाच्या खात्रीअभावी पर्यटकांच्या संख्येत नऊ वर्षांत लक्षणीय घट

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ८

मेळघाट प्रकल्पात 'कॉमन बझर्ड' पक्ष्याची प्रथमच नोंद

यावल वन्यजीव अभयारण्य ८

यावल अभयारण्यातील हंड्याकुंड्या प्रकल्पबाधित क्षेत्रासाठी योजना; खर्च पाटबंधारे विभाग करणार

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ९

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात चंद्रपुरातून आठ वाघ आणण्याला व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची मंजुरी

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ९

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगदा बांधण्याला राज्य वन्यजीव मंडळाची मंजुरी

आरे वसाहतीतील हबळ पाडा रहिवाशांना गोरेगाव मुलुंड रस्ता प्रकल्पामुळे बेघर होण्याची भीती

**प्रादेशिक बातम्या**

राज्यव्यापी १०

राज्य वन्यजीव मंडळाच्या ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत ३१ पैकी २९ प्रकल्पांना मंजुरी

रखडलेल्या वनरक्षक पदभरतीसाठी राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात जाणारः वन मंत्री

शेतीसाठी उपद्रवी ठरणारे वन्य प्राणी मारून टाकण्याची अकोल्याच्या आमदाराची मागणी

विदर्भ १२

गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत माणूस व हत्ती यांच्यातील संघर्षात दोहोंची जीवितहानी

गडचिरोलीत हत्तींकडून जवळपास साडेतीन कोटी रुपयांचे नुकसानः वन विभागाची आकडेवारी

हत्ती आणि वाघांच्या बंदोबस्तासह इतर मागण्यांसाठी गडचिरोली जिल्ह्यात आंदोलन

चंद्रपुरात जागतिक दर्जाच्या व्याघ्र सफारी प्रकल्पासाठी नियोजन करण्याची वन मंत्र्यांची सूचना

रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू; उपाययोजनांचा अहवाल पाच वर्षांपासून धूळ खात

पश्चिम महाराष्ट्र १५

पुणे विभागात वन्य प्राणी बेकायदा पाळल्याप्रकरणी गेल्या पाच वर्षांत कारवायांतून २,३११ प्राणी जप्त

पुणे विभागातून परदेशी वन्य प्राणी व्यावसायिकांचे जवळपास एक हजार नोंदणी अर्ज

माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त १७

माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १८

**आंतरराज्यीय बातम्या**

महाराष्ट्र/ओदिशा १९

महाराष्ट्रातील वाघ २,००० किलोमीटर चालून ओदिशात

**राष्ट्रीय बातम्या** १९

देशातील हत्तींच्या भ्रमणमार्गांविषयी अहवालात गंभीर त्रुटी; योग्य व्याख्येअभावी केली मोजणी

देशातील व्याघ्रमृत्युंच्या वार्षिक आकडेवारीच्या सरकारी व बिगर सरकारी नोंदींमध्ये तफावत

गेल्या दशकातील सर्वाधिक व्याघ्रमृत्यू २०२३ मध्ये; महाराष्ट्रात प्रथमच सर्वाधिक व्याघ्रमृत्युंची नोंद

महाराष्ट्रातील व्याघ्रमृत्युंची वर्ष २०२३ ची सरकारी आकडेवारी


देशातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासासाठी आणखी ११ प्रशिक्षित कुत्रे

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २३

हवामान बदलामुळे सागरी जीवांचे ‘उष्ण कटिबंधीकरण’; शोधनिबंधातील निष्कर्ष

**थोडक्यात पण महत्त्वाचे** २४

मुंबईतील बिबटे


**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ५, अंक १, जानेवारी २०२४ (क्र. १६)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता:**C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेल:**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ:**https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**Duleep Matthai Nature Conservation Trust**

C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/

**Paul Hamlyn Foundation**

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

## संपादकीय

### बिबट्या, वाघ आणि आता हत्ती

सतराव्या शतकात महाराष्ट्राच्या काही भागांत – धुळे, नंदुरबार इथे हत्ती असल्याच्या नोंदी गॅझेटिअर म्हणजे स्थलपरिचय ग्रंथात आढळतात. कोल्हापुरात तत्कालीन संस्थानिकाने १९४० च्या सुमारास कर्नाटकातून हत्ती आणून सोडल्याचा उल्लेख या विषयावरील एका शोधनिबंधात आहे. त्यानंतर १९५० च्या दशकात कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या सीमाभागात हत्ती आल्याची नोंदही आहे. मात्र, एकूणात महाराष्ट्रात हत्तींचे कळप कायमस्वरुपी मुक्कामी नव्हते, असा उल्लेख विविध नोंदींमध्ये आढळतो.

तेव्हा हत्ती हा प्राणी महाराष्ट्राला परिचयाचा असला तरी किमान गेली दोनतीन शतके तरी या प्रदेशातील लोकांना हत्तींबरोबर सातत्याने राहण्याची सवय उरलेली नाही. त्यापूर्वी उपरोल्लेखित संदर्भांनुसार, राज्याच्या काही भागांत हत्ती होते त्या काळातील हत्तींची संख्या, लोकसंख्या, वन्य अधिवासांची व्याप्ती व स्थिती या बाबीसुद्धा वेगळ्या होत्या.

त्यामुळे, ऑक्टोबर २०२१ मध्ये छत्तीसगढमधून हत्तींचा कळप विदर्भात आला तेव्हा नव्याचे नऊ दिवस संपल्यावर उडाली ती भंबेरी साहजिकच होती. सध्या तरुण वा मध्यम वयात असलेल्या स्थानिक लोकांनी हत्ती पाहिलेच नव्हते. त्यामुळे त्यांना हत्तींच्या स्वाभाविक वर्तनाचा अनुभव तर सोडाच पण त्याविषयी जुजबी माहितीही नाही. परिणामी, विदर्भात गेल्या काही महिन्यांत माणूस आणि हत्तींमधील संघर्षाच्या घटनांमध्ये दोहोंची हानी होत आहे.

सध्या या संघर्षावरील उपाययोजना या आग लागली की विहीर खणायला निघाल्यासारख्या आहेत. हत्तींचे आगमन अनपेक्षितरित्या झाल्यामुळे अशी परिस्थिती उद्भवली हे खरे. मात्र, हत्ती केवळ निमित्तमात्र आहे. हत्तींच्या विदर्भातील आगमनापूर्वी वाघांची संख्या, त्यांच्या वावराची व्याप्ती वाढल्याचे परिणाम विदर्भात जनतेच्या व प्रशासनाच्याही अनुभवास आले आहेत. तसेच, राज्यात जवळपास सर्वत्रच थोड्याफार फरकाने बिबट्या आणि माणूस यांच्यातील संघर्षाच्या घटनाही गेली काही वर्षे सातत्याने घडताना दिसून येत आहेत.

वाघ, बिबट्या आणि आता हत्ती; या प्राण्यांच्या वावराची व्याप्ती मनुष्यवस्तीजवळ वाढताना दिसत आहे. किंबहुना, वन्य अधिवासात माणसाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे आपण वन्य प्राण्यांच्या जास्त जवळ जाऊ लागलो आहोत, असे म्हणणे बहुतेक अधिक योग्य ठरेल.

बिबट्या असो, वाघ असो किंवा आता हत्ती, माणूस आणि वन्य प्राणी यांच्यातील संघर्षाच्या घटनांमागे वन्य प्राण्यांची वाढती संख्या, पूर्वी अस्तित्व असलेल्या प्रदेशात त्यांचे पुनरागमन किंवा नव्या प्रदेशात आगमन आणि कित्येक पटींनी व वेगाने माणसांची संख्या आणि त्याच्या नैसर्गिक अधिवासातील वावराची किंबहुना आक्रमक हस्तक्षेपाची वाढती व्याप्ती ही कारणे सारखीच आहेत.

तसेच, प्राणी कोणताही असो संघर्षाच्या घटनांमध्ये होणारी जीवित व मालमत्तेची हानी त्या त्या वन्य अधिवासात, त्या लगत राहणाऱ्या स्थानिक लोकसमुहांना सोसावी लागते. त्यातही उपजीविकेची साधने थेट निसर्गावर अवलंबून आहेत व आर्थिक परिस्थिती जेमतेम, बेताची आहे अशांना या संघर्षाचा ताण जास्त जाणवतो. वन्य अधिवासांच्या ऱ्हासाची कारणे, जमिनीचा वापर वनेतर कारणांसाठी बदलण्यामागील हेतू मात्र दूरस्थ लोकसंख्येच्या फायद्याचे असतात.

माणूस आणि वन्य प्राण्यांचे सहअस्तित्व म्हणतात ते सहअस्तित्व साकारण्यासाठी शिवधनुष्य पेलायचे असते ते पुन्हा स्थानिक लोकसमुदायांनीच. दूरस्थ लोकसंख्येतील बहुतांश जनता ही या समस्यांबाबत पूर्णपणे अनभिज्ञ असते किंवा मग उदासीन तरी.

प्राणी बदलला तरी ही विषमता आणि विरोधाभास कायम राहतो, ही बाब विदर्भात आलेल्या हत्तींच्या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आली आहे.



## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोबा अंधारीत ९३ वाघ; प्रकल्पातील व्याघ्र अधिवासाची वहन क्षमता संपुष्टात

वर्ष २०२३ मध्ये व्याघ्र गणनेच्या चौथ्या टप्प्यातील सर्वेक्षणात मध्ये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ९३ वाघांची नोंद झाली आहे. प्रकल्पातील ही वार्षिक गणना असून यामध्ये वाघांच्या संख्येबरोबरच त्यांच्या भक्ष्य प्रजातींची संख्याही मोजतात. प्रकल्पातील एकूण ९३ वाघांपैकी ४४ नर व ४७ मादी वाघ आहेत; तर दोन वाघांचे लिंग निश्चित करता आलेले नाही.

मार्च ते मे २०२३ या काळात साधारण ५५ दिवसांमध्ये ताडोबा अंधारीच्या ६२५ चौ. किमी गाभा आणि १,१२७ चौ. किमी बफर क्षेत्रात दोन टप्प्यात ही गणना करण्यात आली. त्यामध्ये प्रकल्पातील ६२५ ठिकाणी लावलेल्या १,२५० स्वयंचलित कॅमेऱ्यांनी नऊ लाखांपेक्षा अधिक छायाचित्रे टिपली. त्यातील ५०२ ठिकाणी ४,८५५ छायाचित्रांमध्ये वाघ दिसले; तर ३८९ ठिकाणी २,१७४ छायाचित्रांमध्ये बिबटे दिसले. सुमारे १,४४,००० छायाचित्रांमध्ये चितळ, मुंगूस, हनी बॅजर, पँगोलीन आदी प्रजाती दिसल्या.

वर्ष २०१० मध्ये ताडोबा अंधारीत १५ वाघ होते; गेल्या १३ वर्षांत ही संख्या सहा पटीने वाढली आहे. प्रकल्पातील वाघांची संख्या आता स्थिरावली असून ९३ हा आकडा या प्रकल्पासाठी योग्य आहे, असे ताडोबा अंधारीचे क्षेत्र संचालक व वन संरक्षक जितेंद्र रामगावकर यांनी सांगितले. सध्याची वाघांची संख्या ही प्रकल्पाच्या वहन क्षमतेनुसार सर्वाधिक असून त्यात याहून वाढ होत राहिली तर परिस्थिती आव्हानात्मक होईल, असे ते म्हणाले.

गाभा क्षेत्रातील काही वाघांना त्यांच्यापेक्षा बळकट असलेल्या वाघांनी पळवून लावल्यानंतर ते वाघ बफर क्षेत्रात व त्यालगत असलेल्या प्रदेशात पसरले. त्यातून तिथे आपापसांत हद्दीसाठी लढायांमध्ये काही वाघ मृत्युमुखी पडले आणि जे उरले त्यांच्या मनुष्यवस्तीलगत वावरामुळे माणूस वाघ संघर्ष वाढीस लागला, असे प्रकल्पाच्या गाभा क्षेत्राचे उपसंचालक नंदकिशोर काळे यांनी सांगितले. पुढे, या समस्येवर उपाय म्हणजे वाघांना इतरत्र स्थलांतरित करणे हा असल्याचे ते म्हणाले.

अधिवासाचा ऱ्हास, त्यावर मानवी हस्तक्षेपातून येणारा ताण, वन्य भक्ष्य प्रजाती या बाबी माणूस वाघ संघर्षाबाबत निर्णायक ठरतात, असे म्हणून परिस्थिती बिकट असल्याचे गडचिरोलीचे मानद वन्यजीव रक्षक उदय पटेल यांनी सांगितले.

तीन वर्षांपूर्वी मंजुरी मिळालेल्या वन्यजीव कृती आराखड्यावर आजतागायत अंमलबजावणी झाली नाही, याकडे 'इको-प्रो' या बिगर-सरकारी संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत** – विजय पिंजरकर. . 'Tadoba tiger count rising, experts fear reserve on cusp of saturation,' www.timesofindia.indiatimes.com, १०.११.२०२३.

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटनासाठी प्रायोगिक तत्त्वावर बॅटरीवर चालणारी चार वाहने



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांसाठी असलेल्या वाहनांपैकी चार वाहनांमध्ये पेट्रोलऐवजी बॅटरीवर चालवता येतील असे बदल प्रशासनाने करून घेतले असून त्यांचा वापर सुरू झाला आहे.

पेट्रोलवर चालणारी जिप्सी, कँटर वाहने उपलब्ध आहेत. मात्र, ही वाहने जुनी होऊ लागली की त्यांचा आवाज वाढत जातो. त्यामुळे वाघ आणि अन्य संवेदनशील तृणभक्षी प्राणी विचलित होतात. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात सुमारे ३०० पर्यटक वाहने आहेत. त्यातील चार वाहने आता बॅटरीवर चालवली जात आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण म्हणजेच नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी (NTCA) च्या मार्गदर्शक

तत्त्वांत व्याघ्र प्रकल्पातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी बॅटरीवर चालणारी वाहने पर्यटनासाठी वापरण्याची सूचना होती. बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांमधून कमी आवाज येत असल्यामुळे वन्य प्राणी विचलित होणार नाहीत आणि पर्यटकांना त्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करता येईल. पर्यटक मार्गदर्शकही लहान आवाजात पर्यटकांशी संवाद साधू शकतील, असे हेतू या सुचनेमागे आहेत.

ही सूचना लक्षात घेऊन वन खात्याने पेट्रोलवर चालणारे वाहन बॅटरीवर चालवता येईल असे बदल करुन त्याची तीन महिने चाचणी घेतली. त्यानंतर वाहनधारक या प्रयोगासाठी तयार झाले. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून अशी चार वाहने वापरात आणली आहेत. वाहनात बदल करून घेण्यासाठी वाहनमालकांना आवश्यक खर्चाच्या ५० टक्के रक्कम वन विभागाने नाममात्र व्याजदराने दिली. या प्रकल्पामुळे वाहन मालक-चालकाचा खर्च निम्म्याहून कमी झाला. एका सफारीसाठी किमान हजार रुपयाचे पेट्रोल लागत होते. आता तो खर्च १५० रुपयांवर आला आहे. तसेच पेट्रोल भरण्यासाठी त्यांना शहरात जावे लागत होते; बॅटरी घरी चार्ज करता येते. बॅटरी एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर वाहन सुमारे १२० किलोमीटर अंतर चालते. पर्यटकांचाही या प्रयोगाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – 'वाघाची डरकाळी आता स्पष्ट ऐकू येणार; ताडोबातील पर्यटक वाहनात होतोय बदल,' www.loksatta.com, ०१.०१.२०२४.

### 'चला माझ्या ताडोबाला' उपक्रमांतर्गत यंदा बफर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांना ताडोबा सफारी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघ व इतर वन्यजीवांबद्दल शालेय विद्यार्थ्यांना सानुभव माहिती मिळावी यासाठी ताडोबा प्रशासन 'चला माझ्या ताडोबाला' हा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत ४०,००० विद्यार्थ्यांनी मोफत ताडोबा सफारी केली आहे. यंदा प्रशासन प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना या सफारीवर नेणार आहे.


'चला माझ्या ताडोबाला हा उपक्रम वर्ष २०१५-१६ पासून राबवण्यात येत आहे. बफर क्षेत्रासह प्रादेशिक वन क्षेत्रातील विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत. वर्ष २०२२-२३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील १२५ शाळांतील ५००० विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होता. या १२५ शाळांमध्ये चंद्रपूर जिल्हयातील २७ आश्रमशाळाही होत्या.

आता मूल वन परिक्षेत्रातील भगवानपूर, फुलझरी, करवण, काटवन व डोणी या गावातील शाळांपासून सुरुवात झाली आहे. पैकी भगवानपूर हे पुनर्वसन झालेले गाव आहे. येत्या काळात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील आणि प्रकल्पातून इतरत्र पुनर्वसन करण्यात आलेल्या सर्व गावांतील एकूण १२१ शाळांमधील ५००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे.

**स्रोत** – ''चला माझ्या ताडोबाला' ४० हजार विद्यार्थ्यांनी घेतला मोफत सफारीचा आनंद,' www.loksatta.com, २९.११.२०२३.

## तानसा वन्यजीव अभयारण्य

### गारगाई प्रकल्पासाठी तानसा अभयारण्यातील ७०० हेक्टर जमीन; लाखो झाडे तोडणार



मुंबई शहराची पाण्याची वाढती गरज भागवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात ओगदा ग्रामपंचायत क्षेत्रात गारगाई प्रकल्पाची योजना आखली आहे. ६९ मीटर उंची व ९७२ मीटर लांबीच्या या प्रस्तावित धरणाच्या बुडीत क्षेत्रात ११०० हेक्टर जमीन येणार आहेत. त्यापैकी ७०० हेक्टर जमीन तानसा अभयारण्यातील आहे.

तसेच, प्रकल्पासाठी तानसा वन्यजीव अभयारण्यातील आणि लगतच्या परिसरातील जंगलातील सुमारे साडेचार लाख झाडे तोडावी लागणार आहेत.

गेली अनेक वर्षे अभयारण्यामुळे लागू झालेल्या विविध निर्बंधांचा फटका स्थानिकांना बसला होता. आता मात्र मुंबईसाठी असलेल्या प्रकल्पामुळे वृक्षतोड होऊन अभयारण्यामुळे आजवर राखले गेलेले जंगल नष्ट होणार आहे, या विरोधाभासाकडे स्थानिकांनी लक्ष वेधले आहे.

साडेचार लाख झाडे तोडण्यासाठी परवानगी देण्याकरता या झाडांच्या बदलात अन्य जिल्ह्यांत तिप्पट झाडे लावण्याची अट वन विभागाने घातली असल्याचे वृत्तात नमूद केले आहे. तोडाव्या लागणाऱ्या झाडांपैकी सुमारे दोन लाख झाडांवर क्रमांक घालण्याचे काम अगोदरच पूर्ण झाले आहे. मात्र, गारगाई प्रकल्पासाठी झाडे तोडण्यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेकडून वन्यजीव विभागाकडे कोणताही प्रस्ताव आलेला नाही, असे ठाणे वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षकांनी सांगितले.

मुंबईला दररोज ४४० दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यासाठी गारगाई प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पासाठी वाडा तालुक्यातील ओगदा, तिळमाळ, खोडदे, फणसपाडा, पाचघर, घोडसाखरे या सहा महसूल गावांसह १० ते १२ पाड्यांसह मोखाडा तालुक्यातील आमले हे एक गाव विस्थापित होणार आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी वाडा तालुक्यात वन विभागाची जमीन महानगरपालिकेने पाहिली आहे. तसेच बुडीत क्षेत्रात येणारी खाजगी मालकीची जमीन, झाडे व घरांचा योग्य मोबदला देण्याचे आश्वासन प्रकल्पबाधितांना दिले आहे.

गारगाई प्रकल्पामुळे जवळपास १,००० आदिवासी कुटुंबे विस्थापित होणार आहेत. तसेच प्रकल्प क्षेत्रात येणारी खासगी जमीन संपादित करण्याचे काम सुरु झाले आहे. जमीनमालकांना नोटिशी देऊन भूसंपादनाबाबत विविध वर्तमानपत्रांमध्ये मुंबई महानगरपालिकेने जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत. तरीदेखील या प्रकल्पासाठी पर्यावरण विभाग, वन विभाग व स्थानिक लोकप्रतिनिधींचे एकमत झालेले नाही, असे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – रमेश पाटील. 'तब्बल साडेचार लाख झाडांवर कुऱ्हाड, मुंबईची तहान भागवण्यासाठी वाड्यात गारगाई पाणी प्रकल्प,' www.loksatta.com, २९.११.२०२३.

**तानसा अभयारण्यात पक्षी सप्ताहात १५८ प्रजातींची नोंद**

तानसा वन्यजीव अभयारण्यात ५ नोव्हेंबरपासून आठवडाभर झालेल्या पक्षी सप्ताहात पक्ष्यांच्या १५८ प्रजातींची नोंद झाली. गेल्या वर्षी झालेल्या पक्षी सप्ताहातील प्रजातींच्या तुलनेत ही संख्या ३२ ने अधिक आहे.

वन्यजीव विभाग आणि शहापूर वन विभाग यांच्या सहयोगाने आयोजित पक्षी सप्ताहात 'आऊल कॉन्झर्वेशन फाउण्डेशन'चे सदस्य सहभागी झाले होते.

**स्रोत** – 'तानसा अभयारण्यात १५८ पक्ष्यांची नोंद,' www.loksatta.com, १३.११.२०२३.



## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

**नवेगाव नागझिऱ्यात ब्रह्मपुरीतून आणखी तीन वाघ सोडण्याची तयारी**

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन विभागातून आणखी तीन वाघ सोडण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सध्या सुमारे १६ वाघ आहेत.

यापूर्वी नवेगाव नागझिऱ्यात २० मे २०२३ रोजी गोंदिया जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत दोन वाघिणींना सोडण्यात आले. तो पहिला टप्पा होता. दुसऱ्या टप्प्यात वन विभाग एका नर वाघासह एकूण तीन वाघ सोडणार आहे. त्याचबरोबर व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावांतील गुराख्यांची यादी वन विभाग करणार आहे. गुराख्यांचा जंगलात दिवसाचे ६ ते ८ तास वावर असतो. त्यामुळे या भागातील गुराख्यांशी संपर्क साधून त्यांच्या सूचना व समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न वन विभाग करणार आहे.

दरम्यान, मे २०२३ मध्ये सोडलेल्या दोन वाघिणींपैकी एकीने मध्य प्रदेशातील बालाघाट, वाराशिवनी वनपरिक्षेत्रात स्थलांतर केले. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक ३*)

**स्रोत** – 'नवे पाहुणे येणार! नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात पुन्हा तीन वाघ सोडण्याचे नियोजन,' *www.loksatta.com*, १९.१२.२०२३.



## नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्य

**नांदुरमधमेश्वर अभयारण्यात नोव्हेंबरमध्ये स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन**

नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात स्थलांतरित पक्षी आल्याचे वृत्त आहे.

बदलते वातावरण, अभयारण्य परिसरात अन्नाची उपलब्धता या बाबींमुळे गेल्या दोन-तीन वर्षांत स्थलांतरित पक्ष्यांची संख्या कमी असल्याचा अंदाज वृत्तात नोंदवला आहे. यंदा मात्र पाऊस बऱ्यापैकी झाल्याने धरण, तळे परिसरात मुबलक खाद्य उपलब्ध आहे, त्यामुळे मोठ्या संख्येने पक्षी येतील अशी शक्यता पक्षीनिरीक्षकांनी व्यक्त केली आहे.

पक्षीनिरीक्षणासाठी येणाऱ्या पर्यटकांना वन विभागाने मनोरे, स्पोटिंग स्कोप या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अभयारण्यातील वाटाही नीटनेटक्या केल्या आहेत जेणेकरून पक्ष्यांना त्रास न होता पर्यटकांना अभयारण्यात फिरता येईल.

**स्रोत** – 'परदेशी, स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरुच; नांदुरमध्यमेश्वर अभयारण्यातील किलबिलाट वाढला,' *www.loksatta.com*, २१.११.२०२३.

## बोर व्याघ्र प्रकल्प

**बोर प्रकल्पात व्याघ्रदर्शनाच्या खात्रीअभावी पर्यटकांच्या संख्येत नऊ वर्षांत लक्षणीय घट**

बोर व्याघ्र प्रकल्पात व्याघ्रदर्शनाची खात्री नसल्यामुळे इथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या तुलनेत खूप कमी आहे. परिणामी रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे जंगल सफारीसाठी असलेल्या वाहनांची संख्या २४ वरून १४ वर आली आहे. रोजगाराच्या आशेने कर्ज काढून घेतलेल्या गाड्यांचे हप्ते फेडणे, वाहनमालकांना परवडेनासे झाले आहे.

नागपूर आणि वर्धा अशा दोन जिल्ह्यांमध्ये व्याप्ती असलेल्या बोर प्रकल्पात १६० प्रजातींच्या विविध पक्ष्यांसह वाघ, अस्वल, हरणे, रानकुत्रे आणि नीलगायी आहेत. बोर अभयारण्याला लागून असलेले माळेगाव ठेका, बोरी, आमगाव, ढगा, बांगडापूर, रायपूर, हिंगणी, सालई कला, तामसवाडा ही गावे आदिवासी संस्कृतीची ओळख करून देतात. बोर, रिधोरा, नानबर्डी, मदन यासारख्या धरणांचे जलाशय इथे आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने पूरक असूनही इथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी आहे.

वाघ पाहण्यासाठी बोर व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या पर्यटकांना सफारीसाठी साधारणतः ५,००० रुपयांचा खर्च करावा लागतो. वन विभागाचे २,००० रुपये शुल्क, गाडीभाडे २,५०० रुपये व इतर असे खर्चाचे नियोजन आहे. हा सर्व खर्च करूनही वाघ दिसला नाही की पर्यटकांचा हिरमोड होतो. त्यामुळे पर्यटकांची संख्या कमी होऊ लागल्याचे वृत्तात म्हटले आहे. प्रकल्पात कार्यरत असलेल्या पर्यटक मार्गदर्शकांची संख्याही २५ वरून १५ वर आली आहे.

बोरमधील निसर्ग पर्यटन केंद्राचे व्यवस्थापन नागपुरातून पाहिले जाते. सुविधांच्या अभावामुळे फारसे पर्यटक केंद्रात जात नाहीत. प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराजवळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. बोर धरणाच्या पायथ्याशी बांधलेल्या उद्यानात सुविधाच उरल्या नसल्यामुळे इकडेही पर्यटक येईनासे झाले आहेत. सिंचन विभागाच्या अखत्यारित हे उद्यान आहे. त्यामुळे वन विभाग सिंचन विभागाकडे अंगुलीनिर्देश करतो, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – ''बोर'मध्ये पर्यटनाला घोर; पर्यटकांच्या अल्प प्रतिसादामुळे नऊ वर्षांत जिप्सी, गाइडची संख्या घटली,' *marathi.indiatimes.com*, १५.१२.२०२३.



## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाट प्रकल्पात 'कॉमन बझर्ड' पक्ष्याची प्रथमच नोंद

मेळघाटात सुमारे १५० वर्षांपूर्वी पक्षीनिरीक्षणाच्या नोंदी आहेत. त्यानंतर वेगवेगळ्या काळात झालेल्या अभ्यासातून आजवर पक्ष्यांच्या ३०४ प्रजातींची नोंद मेळघाटात झाली आहे. या यादीत 'कॉमन बझर्ड' या पक्ष्याची भर पडली आहे. या नोंदीमुळे मेळघाटातील पक्ष्यांच्या प्रजातींची संख्या ३०५ झाली आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) ने चार दिवसीय निसर्ग शिबिराचे आयोजन केले होते. शिबरार्थी व तज्ञ मार्गदर्शकांना अकोट वन्यजीव विभागात धारगड भागात कॉमन बझर्ड हा पक्षी दिसला. वाळलेल्या झाडाच्या खोडावर बसलेल्या पक्ष्याचे निरीक्षण केले असता तो अपेक्षित प्रजातीपेक्षा वेगळा वाटल्यामुळे तज्ञ व शिबिरार्थींनी थांबून त्याचे बारकाईने निरीक्षण केले. चांगली छायाचित्रेही टिपली. त्यानंतर तो कॉमन बझर्ड असल्याची खात्री करून घेतली.

या पक्ष्याची ही मेळघाटातील पहिलीच नोंद आहे. हा पक्षी हिवाळ्यात स्थलांतर करून भारतात येत असून याच्या तुरळक नोंदी यापूर्वी मध्य भारतात व महाराष्ट्रात झाल्या आहेत. उत्तर पाकिस्तान व कश्मिरमध्ये राहणारा हा पक्षी हिवाळ्यात दक्षिणेकडे केरळ व पुढे श्रीलंकेत जातो.

शिबिरार्थींना मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये पक्षी अभ्यासक व मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर, 'निसर्ग संरक्षण संस्थे'चे अध्यक्ष प्रा. डॉ. निशिकांत काळे, BNHS चे नंदकिशोर दुधे, 'पक्षीमित्र'चे अमोल सावंत यांचा समावेश होता.

**स्रोत** – 'मेळघाटात 'सामान्य बाज' या दुर्मिळ पक्ष्याची प्रथमच नोंद,' [www.loksatta.com](http://www.loksatta.com), १५.१२.२०२३.

## यावल वन्यजीव अभयारण्य

### यावल अभयारण्यातील हंड्याकुंड्या प्रकल्पबाधित क्षेत्रासाठी योजना; खर्च पाटबंधारे विभाग करणार

जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात प्रस्तावित हंड्या-कुंड्या लघू पाटबंधारे प्रकल्पामुळे यावल वन्यजीव अभयारण्यातील क्षेत्र बाधित होणार आहे. या प्रकल्पबाधित वन क्षेत्रासाठी वन्यजीव व्यवस्थापन योजना मंजूर झाली आहे. योजनेच्या अंमलबजावणीचा खर्च लघू पाटबंधारे विभाग करणार आहे.

खर्चाची रक्कम पाटबंधारे विभागाने वन विभागाकडे हस्तांतरित करावी, असा निर्णय झाला आहे. जळगाव जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली २७ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत यावल अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्र संनियंत्रण समितीने हा निर्णय घेतला.

हंड्या-कुंड्याच्या साठवण तलावासाठी ३१.४९ हेक्टर क्षेत्राचा प्रस्ताव आहे. त्यातील वन जमिनीसाठी वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र सरकारची तत्वत: मंजुरी मिळाली आहे. प्रकल्प भागातील वन्यजीवांना अधिवासास योग्य पर्यावरण राहावे यासाठी वन्यजीव व्यवस्थापन योजना करून त्यावर अंमलबजावणीसाठी लघू पाटबंधारे विभागाने वन विभागाला १,३८,७२,००० रुपये द्यावेत, असे बैठकीत ठरले.

**स्रोत** – 'हंड्या-कुंड्या पाटबंधारे प्रकल्प बाधित अभयारण्य क्षेत्रात योजना; वन्यजीव व्यवस्थापनला मान्यता,' [www.esakal.com](http://www.esakal.com), २८.१२.२०२३.



## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात चंद्रपुरातून आठ वाघ आणण्याला व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची मंजुरी



सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात कायमस्वरुपी वाघ असावेत, यासाठी राज्याच्या वन खात्याने चंद्रपुरातून वाघ आणण्याचा प्रस्ताव मांडला होता. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण अर्थात नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी (NTCA) ने चंद्रपूर जिल्ह्यातील आठ वाघ सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सोडण्याची परवानगी दिली आहे. अंमलबजावणीसाठी NTCAने १०.५ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील जंगलात १२ डिसेंबर रोजी गस्त घालणाऱ्या वनरक्षक व वनमजुराला वाघाच्या पायाचे ठसे आढळले. पुढे तीन दिवस वेगवेगळ्या ठिकाणी असे ठसे व वाघाची विष्ठा दिसून आली. तेव्हा वन विभागाने या परिसरात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यांची तपासणी केली. त्यामध्ये १७ डिसेंबरच्या पहाटे पाचच्या सुमारास वाघाचे छायाचित्र कॅमेऱ्यात आल्याचे दिसून आले.

वर्ष २०१४ मधील व्याघ्रगणनेनुसार सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात तीन वाघ असल्याची नोंद आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा भाग असलेल्या राधानगरी अभयारण्यात २३ एप्रिल २०२२ रोजी स्वयंचलित कॅमेऱ्यात पूर्ण वाढ झालेल्या वाघांचे छायाचित्र आले होते. तत्पूर्वी २०२१ मध्ये या ठिकाणी वाघाचे छायाचित्रण झाले होते.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघ सामावून घेण्याची क्षमता असतानाही इथे वाघ स्थिरावले नाहीत. साधारणपणे मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यांत प्रकल्पात वाघांचा वावर दिसून येतो. नैसर्गिक संरचना आणि अपुरे मनुष्यबळ हेदेखील वाघ न स्थिरावण्यामागील एक कारण आहे, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – ''सह्याद्री'त पुन्हा एकदा वाघांच्या पाऊलखुणा; वाघाच्या स्थलांतरणाचा मार्ग मोकळा!'
*www.loksatta.com*, २२.१२.२०२३.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून बोगदा बांधण्याला राज्य वन्यजीव मंडळाची मंजुरी

मुंबई महानगरातील ठाणे आणि बोरिवली यांना जोडणाऱ्या मार्गावरील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या दुहेरी बोगद्याच्या बांधकामाला राज्य वन्यजीव मंडळाने मंजुरी दिली. राज्य वन्यजीव मंडळाच्या १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या २२ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात झाला. (बैठकीतील अन्य निर्णयांविषयीचे वृत्त पान क्र. १० वर)

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील बोरीवली आणि ठाणे शहराला जोडण्यासाठी असलेल्या मार्गावर १०.२५ किमी लांबीचा बोगदा व १.५५ किमी लांबीचा बोगद्यापर्यंत जाणारा मार्ग असा १३.०५ मीटर अंतर्गत व्यासासह सुमारे १२ किमी लांबीचा दुहेरी भूमिगत बोगदा असणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या या बोगद्याचे बांधकाम हे चार टनेल बोअरिंग यंत्रे वापरून केले जाणार आहे. (संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक ३, २*)

**स्रोत** – 'ठाणे आणि बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाला राज्य वन्यजीव मंडळाची परवानगी!'
www.esakal.com, २०.१०.२०२३.

### आरे वसाहतीतील हबळ पाडा रहिवाशांना गोरेगाव मुलुंड रस्ता प्रकल्पामुळे बेघर होण्याची भीती

गोरेगावातील चित्रनगरीजवळ असलेला साधारण ६५ घरांचा हबळ पाडा गोरेगाव मुलुंड जोड रस्ता प्रकल्पाच्या विरोधात उभा राहिला आहे. हबळ पाड्याने आरे दुग्ध वसाहतीतील वन जमीनीवर असलेल्या इतर गावांच्या प्रकल्पविरोधी लढ्यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. जोड रस्त्याचा नेमका मार्ग दर्शवणाऱ्या कागदपत्रांची हबळ पाड्याने माहितीच्या अधिकारांतर्गत मागणी केली आहे, जेणेकरून इथल्या रहिवाशांना त्यांच्या पाड्याचे भवितव्य जाणून घेता येईल.

गोरेगाव मुलुंड जोड रस्ता (GMLR) प्रकल्पासाठी आठ महिन्यांच्या निविदा प्रक्रियेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने जुलै २०२३ मध्ये ६,३०१ कोटी रुपयांची विजेती निविदा स्वीकारली. मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडण्यासाठी असलेल्या या प्रकल्पात संजय गांधी राष्ट्रीय उद्याना- (SGNP) -खालून जाणाऱ्या दुहेरी बोगद्याचा समावेश आहे (संबंधित वृत्त पान क्र. ९ वर). मुलुंडमधील खिंडीपाडा ते गोरेगावच्या चित्रनगरीपर्यंत हा सहा पदरी बोगदा प्रस्तावित आहे.

या बोगद्यामुळे SGNP किंवा लगतच्या आरे वसाहतीतील जमिनीला कोणत्याही प्रकारे धोका पोहोचणार नाही, असे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) पी वेलरासू यांनी म्हटले आहे. हबळ पाडा ग्रामस्थांनी मात्र बोगद्यापर्यंत जाणारा रस्ता पाड्यातून बांधावा लागेल अशी शक्यता लक्षात घेत आपल्या घरांचे काय होईल, असा प्रश्न उपस्थित केला आहे. महानगरपालिकेने या पाड्याजवळच्या झाडांवर तोडण्यासाठी खुणा केल्या आहेत. पाड्याच्या एका रहिवाशाने सांगितले की त्यांनी बांधकामाला मंजुरी द्यावी याकरता त्यांच्यावर दबाव आणला जात आहे.

वन हक्क कायदा २००६ अनुसार आदिवासी व इतर वनाधारित समुहांच्या वनावरील हक्कांना मान्यता दिल्यानंतर धोरण, प्रकल्प, योजनादी बाबत निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले जावे. मात्र, हबळ पाड्यातील रहिवाशांना घरे सोडण्याच्या नोटिसा वर्ष २०१८ पासून येत आहेत.

आरे वसाहतीतील वन क्षेत्रात जवळपास १०,००० लोकसंख्या २७ पाड्यांमध्ये राहते. यातील बहुसंख्य पाडे दुग्ध वसाहतीच्या निर्मितीपूर्वीपासून अस्तित्वात आहेत. गेली अनेक वर्षे दहशतवादविरोधी पथक प्रशिक्षण छावणी प्रकल्पासाठी आपल्याला विस्थापित केले जाऊ नये याकरता केतली पाड्यातील वारली समुदाय लढा देत आहे; तर प्रजापूर पाड्यातील कोकणा समुदाय मेट्रो कारशेड विरोधात लढत आहे.

**स्रोत** – शेरीन राज. ‘GMLR project approval brings eviction worries for tribal families,’ [www.mumbai.citizenmatters.in](www.mumbai.citizenmatters.in), १०.११.२०२३.

## प्रादेशिक बातम्या

### राज्यव्यापी

#### राज्य वन्यजीव मंडळाच्या ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत ३१ पैकी २९ प्रकल्पांना मंजुरी

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळ म्हणजेच ‘स्टेट बोर्ड फॉर वाइल्डलाईफ’ने प्रस्तावित ३१ प्रकल्पांपैकी फक्त दोन प्रकल्प वगळून इतर सर्व २९ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.

राज्य वन्यजीव मंडळाची २२ वी बैठक अवघ्या दोन दिवसांच्या आगाऊ सूचनेनंतर १६ ऑक्टोबर रोजी झाली. या बैठकीत सरकारच्या जल जीवन अभियानांतर्गत पेयजल पुरवठ्याचे १४ प्रकल्प, यवतमाळ जिल्ह्यातील वाघांच्या भ्रमणमार्गात असलेला मारकी-मांगली २ कोळसा खाणकाम प्रकल्प यांच्यासह ऑप्टिकल फायबर केबल, वीजवाहक तारा, रस्ता रुंदीकरणाच्या विविध प्रकल्पांना मंजुरी मिळाली. मानसिंगदेव वन्यजीव अभयारण्यातील एकमेव गाव सालेघाटचे इतरत्र पुनर्वसन करून पेंच व्याघ्र प्रकल्पाची व्याप्ती वाढवण्याला मंडळानं मंजुरी दिली. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या बोगद्यांनाही मंडळाने मान्यता दिली आहे (सविस्तर वृत्त पान क्र. ९ वर).

मंजुरी मिळालेल्या पेयजल पुरवठा प्रकल्पांमध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्प, जायकवाडी पक्षी अभयारण्य, तानसा वन्यजीव अभयारण्य या संरक्षित क्षेत्रांच्या पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रांत येणाऱ्या प्रकल्पांचा समावेश आहे. करंजा सोहोळ वन्यजीव अभयारण्य, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागझिरा वन्यजीव अभयारण्याच्या गाभा व बफर क्षेत्रांत बीएसएनएल फोर-जी मोबाईलसेवेसाठी मनोरे उभारण्याच्या प्रकल्पांनाही मंजुरी मिळाली आहे. बोर, पेंच आणि उमरेड कऱ्हांडला या व्याघ्र अधिवासांना जोडणाऱ्या भ्रमणपट्ट्यातून २२० केव्ही क्षमतेच्या दोन वीजवाहक तारा नेण्याचा प्रकल्पही मंडळाने मंजूर केला.

चंद्रपूर जिल्ह्यात लोहारडोंगरी इथे लोहखनिजासाठी भूपृष्ठावर खाणकाम आणि असोलामेंढा धरणाचा विस्तार करण्याला राज्य वन्यजीव मंडळाने मंजुरी नाकारली आहे.

मात्र, हा मंडळाचा अंतिम निर्णय नसून या संदर्भात अधिक अभ्यास करण्यासाठी चंद्रपूरचे वन संरक्षक, राज्य वन्यजीव मंडळाचे दोन सदस्य अशा तिघांची समिती नेमली

आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर या प्रकल्पांबाबत मंडळ निर्णय घेणार आहे. प्रस्तावित लोहारडोंगरी खाणीसाठी ब्रह्मपुरी वन क्षेत्रातील ३६ हेक्टर जमीन लागणार आहे तर असोलामेंढा सिंचन प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तारीकरणासाठी मूल, सावली भागातील ३१६ हेक्टरपेक्षा अधिक वन जमीन लागणार आहे. लोहारडोंगरी खाण ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला उमरेड कऱ्हांडला अभयारण्याशी जोडणाऱ्या क्षेत्रात प्रस्तावित असून ते ठिकाण घोडेझरी वन्यजीव अभयारण्य आणि एकारा भुज राखीव संवर्धन क्षेत्रांजवळ आहे. पाथरी नदीवर सिंदेवाही इथे असलेल्या असोलामेंढा धरणाची उंची २.७ मीटरने वाढवण्याचा प्रस्ताव असून त्यामुळे जलाशयाची व्याप्ती वाढणार आहे. पाण्याखाली वन जमीन जाणार असून कालवे बांधण्यासाठीही वन जमीनच लागणार आहे. त्याशिवाय ६२८ हेक्टर बिगर-वन जमीन पाण्याखाली जाणार असून १८ गावांचाही समावेश आहे.


हा प्रकल्प झाला तर ताडोबा, सिंदेवाही आणि मूल यांना गडचिरोली आणि असोलामेंढा द्वारे छत्तीसगढमधील व्याघ्र अधिवासांना जोडणारा भ्रमणपट्टा खंडित होईल. अधिवास विभाजीत झाल्यामुळे या भागात आधीच तीव्र असलेला माणूस वन्यजीव संघर्ष आणखी गंभीर होईल, असे मानद वन्यजीव रक्षक आणि राज्य वन्यजीव मंडळाच्या माजी सदस्याने म्हटले आहे.

वर्ष २०२३ मध्ये सप्टेंबर अखेरपर्यंत वाघ माणूस संघर्षाच्या घटनांमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात १६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

**स्रोत** – विजय पिंजरकर. 'SBWL says 'no' to Lohardongri mine, Asolamendha dam expansion,' *www.timesofindia.indiatimes.com*, १८.१०.२०२३.



## रखडलेल्या वनरक्षक पदभरतीसाठी राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात जाणार: वन मंत्री



पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) कायदा १९९६ म्हणजेच पेसा कायद्याअंतर्गत येणाऱ्या गावातील वनरक्षकांची पदे वगळता इतर पदे तात्काळ भरण्यासाठी वन विभाग राज्य सरकारमार्फत सर्वोच्च न्यायालयाला विनंती करणार आहे. मात्र पेसा क्षेत्राच्या अधिसूचनेसंदर्भात संपूर्ण निकाल जाहीर झालेला नाही. त्यामुळे राज्यातील एकूणच वनरक्षक पदभरती रखडली आहे.

'महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळा'च्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर यांच्याशी चर्चा करून भरती प्रक्रियेचा आढावा घेतला आणि त्यानंतर हा निर्णय घेतला. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात विशेष वकील नियुक्त करण्याची कार्यवाही करा, असे निर्देशही वन मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

हजारो उमेदवारांनी वनरक्षक पदाची परीक्षा जुलै व ऑगस्ट २०२३ मध्ये दिली आहे. हे उमेदवार निकालाच्या व पर्यायाने पदभरतीच्या प्रतीक्षेत आहेत. ही बाब लक्षात घेऊन वन मंत्र्यांनी वन विभागाला सूचना केल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – 'उमेदवारांच्या हितासाठी सर्वोच्च न्यायालयात जाणार, वन मंत्री मुनगंटीवार यांचा मोठा निर्णय,' *www.loksatta.com*, ३०.११.२०२३.

## शेतीसाठी उपद्रवी ठरणारे वन्य प्राणी मारून टाकण्याची अकोल्याच्या आमदाराची मागणी

रानडुक्करे, हरणे आणि नीलगाई मारुन टाका किंवा त्यांना संपवण्याची परवानगी आम्हाला द्या, अशी मागणी राज्याच्या हिवाळी अधिवेशनात भाजपाच्या अकोला जिल्ह्यातील आमदाराने केली. सत्ताधारी पक्षाच्या

आमदारानेच ही मागणी केल्यामुळे तृणभक्षी प्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानाची समस्या पुन्हा एकदा समोर आली आहे.

शेतकऱ्यांनी सर्वत्र हरभऱ्याची लागवड केली असून रानडुक्करे, नीलगाई आणि हरणे या प्राण्यांकडून होणारे पिकाचे नुकसान टाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. पिकांच्या राखणीसाठी त्यांना रात्रभर शेतात राहावे लागत आहे. त्यामुळे वन खात्याने या प्राण्यांना मारून टाकावे किंवा त्यांना मारण्याची परवानगी आम्हाला द्यावी, अशी मागणी अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे आमदार हरीश पिंपळे यांनी १३ डिसेंबर रोजी विधीमंडळात केली.

या मागणीमुळे राज्यात माणूस वन्यजीवांमधील वाढता संघर्ष, मांसभक्षी प्राण्यांकडून माणसांवर, पाळीव जनावरांवर होणारे हल्ले, तृणभक्षी प्राण्यांकडून होणारे शेतीचे नुकसान आणि वन विभागाकडून मिळणारी अपुरी नुकसानभरपाई हे मुद्दे ऐरणीवर आल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – 'रानडुक्कर, हरिण आणि नीलगाय मारुन टाका… भाजपचे आमदार असे का म्हणाले?' *www.loksatta.com*, १३.१२.२०२३.

विदर्भ

**गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत माणूस व हत्ती यांच्यातील संघर्षातून दोहोंची जीवितहानी**



गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा तालुक्यातील वाढोणा इथे ३१ डिसेंबर रोजी विजेचा धक्का लागून एका हत्तीचा मृत्यू झाला. जंगलालगत असलेल्या शेताच्या कुंपणात शेतकऱ्याने पिकांच्या राखणीसाठी वीजप्रवाह सोडला होता. पहाटे तीनच्या सुमारास वाढोणा परिसरात हत्तींचा कळप आला. कळपातील एका मादीला जिवंत तारेचा स्पर्श झाल्यामुळे जोरदार विजेचा धक्का लागला व त्यात तिचा जागीच मृत्यू झाला.

वन विभाग या कळपावर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे लक्ष ठेवून आहे. त्यामुळे ही घटना दिसून आल्यावर वनाधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. ३१ डिसेंबरच्या पहाटे ही घटना घडली. त्यानंतर सकाळी मृत हत्ती पाहण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती. तसेच धानाचे तणस टाकून हत्तीचा मृतदेह जाळून टाकण्याची तयारी सुरू केली होती. वन विभागाने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता वनाधिकारी आणि ग्रामस्थांमध्ये शाब्दिक चकमक झाली. यामुळे तणाव निर्माण झाला व पोलिस पथकाला पाचारण करण्यात आले.

तत्पूर्वी, ३० डिसेंबर रोजी आरमोरी तालुक्यातील शंकरनगर इथे ६७ वर्षीय महिलेचा हत्तींच्या याच कळपाने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला.

डिसेंबरच्या मध्यात हा कळप गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात गेला होता. तेव्हा या हत्तींनी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कालीमाती, बोळदे परिसरातील शिवारात पाच दिवस मुक्काम केला.

गोंदिया जिल्ह्यातून हत्ती पुन्हा गडचिरोली जिल्ह्यात परतले आणि आरमोरी तालुक्यातील पाथरगोटा गावात २४ डिसेंबर रोजी मध्यरात्री हत्ती शिरले. जवळपास २०-२२ हत्ती अचानक आल्यामुळे पाच कुटुंबांना घरे सोडून पळ काढावा लागला. कळपाकडून घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

हत्तींचा आवाज ऐकून एका घरातील सर्व सदस्यांनी उठून घराच्या मागच्या दरवाज्याने पळ काढला आणि मोठ्याने आरडाओरडा करून शेजाऱ्यांना जागे केले. या परिसरातील घरांमधील सगळे सदस्य घराबाहेर पळाले. यानंतर संपूर्ण गाव जागे झाले, पण जीवाच्या भीतीने कोणीही घराबाहेर पडले नाही. ग्रामस्थांनी वन विभागाला कळवले तेव्हा वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक आले आणि त्यांनी हुल्ला पार्टीच्या मदतीने हत्तीच्या कळपाला हुसकावून लावले. या प्रकारात घरांचे नुकसान झाले, मात्र जीवितहानी झाली नाही. नुकसान झालेल्या घरांमधील कुटुंबांना

तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करुन भरपाई द्यावी, अशी मागणी आहे.

यापूर्वी शंकरनगर इथे ९ सप्टेंबर रोजी हत्ती आले होते तेव्हा शेतकऱ्यांच्या शेतातील धान्यासह बोअरवेल, इलेक्ट्रिक साहित्याचेही नुकसान झाले होते. आता हत्ती पुन्हा आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

धान (भात) पिकाचे नुकसान टाळण्यासाठी राखणीला गेलेल्या शेतकऱ्याचा हत्तीने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला. ही घटना गडचिरोली तालुक्यातील मरेगावजवळ २५ नोव्हेंबरला रात्री ८ वाजता झाली. चांभार्डा व मरेगाव परिसरात साधारण १५ नोव्हेंबरपासून हत्तींचा वावर होता. त्यामुळे पिकाच्या राखणीसाठी हा शेतकरी अन्य शेतकऱ्यांसह शेताकडे गेला होता. त्यावेळी वडधा-मौशिखांब मार्गालगत हत्तींचा कळपाचा वावर होता. सायकलने घराकडे परतत असताना या शेतकऱ्यावर हत्तीने हल्ला केला व डांबरी रस्त्यावरच त्यांना चिरडले.

गेल्या तीन महिन्यांतील हा तिसरा मृत्यू ठरला. यापूर्वी १६ सप्टेंबर रोजी आरमोरी तालुक्यातील पळसगावात सहाय्यक वनसंरक्षकांचे वाहनचालक आणि १७ ऑक्टोबर रोजी गडचिरोली तालुक्यातील दिभना इथे शेतकऱ्याचा मृत्यू झाला.
(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १, ३, खंड ४ अंक १, ३*)

**स्रोत** – 'शेतात हत्तीचा मृतदेह; गावकऱ्यांकडून अंत्यसंस्काराची घाई, मात्र ट्रॅप कॅमेऱ्यात दिसलं भलतंच,' *marathi.indiatimes.com*, ०१.०१.२०२४.
'गडचिरोली: विजेच्या धक्क्याने हत्तीचा मृत्यू,' *www.loksatta.com*, ३१.१२.२०२३.
'गडचिरोली: रानटी हत्तींच्या हल्ल्यात वृद्ध महिला ठार, आरमोरी तालुक्यातील शंकरनगरात मध्यरात्री थरार,' *www.loksatta.com*, ३०.१२.२०२३.
'पाथरगोटात रानटी हत्तींचा धुडगूस; पाच घरांची नासधूस, मध्यरात्री नागरिकांची पळापळ,' *www.loksatta.com*, २६.१२.२०२३.
'गोंदिया: अर्जुनी मोरगाव तालुक्यात रानटी हत्तींचा मुक्काम, शेतकऱ्यांची चिंता वाढली,' *www.loksatta.com*, १७.१२.२०२३.
'गडचिरोली: रानटी हत्तींनी घेतला पुन्हा एक बळी, पिकाचे संरक्षण बेतले जीवावर,' *www.loksatta.com*, २६.११.२०२३.

## गडचिरोलीत हत्तींकडून जवळपास साडेतीन कोटी रुपयांचे नुकसान: वन विभागाची आकडेवारी



सुमारे तीन वर्षांपूर्वी छत्तीसगड मार्गे गडचिरोली जिल्ह्यात आलेल्या हत्तींकडून झालेली जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानाच्या भरपाईदाखल वन विभागाने डिसेंबर २०२३ पर्यंत ३ कोटी ४८ लाख ४४ हजार १११ रुपये दिले आहेत.

हत्तींना हुसकावून लावण्यासाठी पश्चिम बंगालमधून हुल्ला पथकाला पाचारण केले आहे. या पथकामध्ये दहा जणांचा समावेश आहे. पथकातील सदस्य सरकारी कर्मचारी नाहीत. 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने'च्या दरानुसार त्यांना वेतन दिले जाते. त्यांच्या निवास आणि जेवणाचा खर्च वन विभाग करत आहे. या हुल्ला पथकाच्या मदतीला वन विभागाने २५ जणांचे प्राथमिक बचाव पथकही तयार केले आहे. वडसा आणि गडचिरोली वन विभाग दोन थर्मल ड्रोन कॅमेऱ्यांमार्फत हत्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

हत्तींकडून वडसा वन विभागात सर्वाधिक नुकसान झाले आहे. या विभागात मागील तीन वर्षांत नुकसानभरपाईदाखल २ कोटी ९६ लाख ३९ हजार ९७३ रुपये देण्यात आले आहेत. त्यात पिकांची नुकसानभरपाई म्हणून २ कोटी ६ लाख ३५ हजार ५२३ रुपये, चार मृतांच्या वारसांना मिळून ७५ लाख व ३७ घरांच्या नुकसानभरपाईपोटी १५ लाख ४ हजार ४५० रुपयांचा समावेश आहे.

गडचिरोली वन विभागाच्या हद्दीत तीन वर्षांत नुकसानभरपाईदाखल ५२ लाख ४ हजार १३८ रुपये वन विभागाने दिले आहेत.

**स्रोत** - महेश तिवारी. 'गडचिरोलीत जंगली हत्तींकडून ३.४८ कोटींचे नुकसान; मागील सहा महिन्यांत ५ बळी, पिकांसह घरेही लक्ष्य,' *marathi.indiatimes.com*, ०९.०१.२०२४.

## हत्ती आणि वाघांच्या बंदोबस्तासह इतर मागण्यांसाठी गडचिरोली जिल्ह्यात आंदोलन


गडचिरोली जिल्ह्यात हत्ती आणि वाघांमुळे होणारी जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी गडचिरोली जिल्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चंद्रपुरात वन मंत्र्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे –

- हत्ती आणि 'नरभक्षक' वाघांचा तातडीने बंदोबस्त करावा.
- हत्ती, वाघ किंवा अन्य कोणत्याही वन्य प्राण्याच्या हल्ल्यातील जखमी व मृत व्यक्तीच्या कुटुंबाला तातडीने भरीव आर्थिक मदत मिळावी.
- निष्पाप नागरिकांचा जीव गेल्यास वनाधिकाऱ्यांवर भारतीय दंड विधान ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा.
- शेतीच्या नुकसानभरपाईदाखल शेतकऱ्यांना सरसकट २५,००० रुपये द्यावेत.
- वन पट्ट्याच्या प्रलंबित मागण्या निकाली काढून वन पट्टे व सातबाऱ्याचे वितरण करावे.
- सुरजागड इथे होत असलेल्या बेकायदा वृक्षतोडीची चौकशी करून संबंधित कंपनीवर कारवाई करावी.
- पिकाच्या रक्षणासाठी चेनलिंक प्रकारच्या कुंपणाची व्यवस्था करून द्यावी.
- रोजगारनिर्मितीसाठी कमलापूरसह जिल्ह्यातील वनांतील पर्यटन स्थळांचा विकास करावा.
- गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागातील रिक्त पदांवर तातडीने भरती करावी.

आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांनी संपर्क साधला असता वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गडचिरोली जिल्हा काँग्रेस समितीच्या शिष्टमंडळाला नागपूर इथे ११ डिसेंबर २०२३ रोजी बैठकीचे आमंत्रण दिले. या बैठकीविषयीचे वृत्त प्राप्त झाले नाही.

**स्रोत** – 'गडचिरोलीच्या हजारो शेतकऱ्यांचे चंद्रपूरात ठिय्या आंदोलन, हत्ती आणि वाघांचा बंदोबस्त करण्याची मागणी,' *www.loksatta.com,* ०१.१२.२०२३.



## चंद्रपुरात जागतिक दर्जाच्या व्याघ्र सफारी प्रकल्पासाठी नियोजन करण्याची वन मंत्र्यांची सूचना

चंद्रपूर इथे जागतिक दर्जाचा व्याघ्र सफारी प्रकल्प करण्याचा मानस राज्याचे वन आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. नागपूर इथे वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.


चंद्रपूर-मूल मार्गावर वन प्रबोधिनी जवळ असलेल्या प्रशस्त वन क्षेत्रात व्याघ्र सफारी प्रकल्प उभारण्यासाठी अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. हा प्रकल्प केवळ व्याघ्र सफारीपुरता मर्यादित न ठेवता इतर वन्यजीवांचाही त्यात समावेश करण्यासाठी प्रयत्न व्हावा, प्रकल्पात संशोधनाला वाव असावा, अशा अपेक्षा वन मंत्र्यांनी व्यक्त केल्या.

पर्यटनाला चालना मिळेल, रोजगार निर्मिती व अर्थकारण मजबूत होण्यास मदत होईल अशा प्रकारे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

बैठकीला प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, वन बल प्रमुख शैलेंद्र टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महीप गुप्ता, वन विकास महामंडळाचे संजीव कुमार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

**स्रोत** – '"चंद्रपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्याघ्र सफारी प्रकल्प," वनमंत्री मुनगंटीवार म्हणतात,' *www.loksatta.com*, ०६.१२.२०२३.

### रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू; उपाययोजनांचा अहवाल पाच वर्षांपासून धूळ खात



चंद्रपूर जिल्ह्यात नोव्हेंबर अखेरीस नागभीड-तळोधी रेल्वेमार्गावर किटाळी मेंढाजवळ चार महिन्यांच्या वाघिणीचा गाडीची धडक बसल्याने मृत्यू झाला. नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या दौऱ्यासाठी ही विशेष गाडी निघाली होती. वास्तविक वन्य प्राण्यांचे रेल्वे अपघातांत होणारे मृत्यू टाळण्यासाठी उपायोजना करण्याबाबत अहवाल पाच वर्षांपूर्वी तयार करण्यात आला आहे. मात्र, त्यातील सूचनांवर अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. चंद्रपुरातील अपघातामुळे ही बाब पुन्हा चर्चेत आली आहे.

चंद्रपूर-गोंदिया व नागभीड-नागपूर हे रेल्वेमार्ग ताडोब्यामधून जातात. हे रेल्वेमार्ग तेलंगण, छत्तीसगड, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या भागातील जंगलांना जोडणाऱ्या वाघांच्या भ्रमणमार्गावरील परिसरात आहेत. या भागात जुनोना इथे १५ नोव्हेंबर २०१८ रोजी रेल्वे अपघातात वाघाच्या तीन बछड्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर चंद्रपूरचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव यांनी रेल्वेला अपघात टाळण्यासाठी उपाययोजनांबाबत सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

वनाधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने संपूर्ण रेल्वेमार्गावर फिरून अहवाल तयार करून नागपूरच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना दिला. अहवालात धोकादायक म्हणून किमान १९ रेल्वे खांबांची नोंद करण्यात आली; या भागातून रेल्वे गाड्यांचा वेग कमी करावा, ब्रह्मपुरी व चंद्रपूर विभागातील मामला, जुनोना, सिंदेवाही, चिचपल्ली, तळोधी, बाळापूर, नागभीड वन क्षेत्रात वन्य प्राण्यांसाठी रेल्वेमार्गाखालून भुयारी मार्ग बांधावेत, अशा सूचना केल्या होत्या. रेल्वे रूळांलगत कंत्राटदारांनी खोदून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साठल्यामुळे ते पिण्यासाठी वन्य प्राणी येतात व रेल्वे अपघात होतात. त्यामुळे हे खड्डे तात्काळ बुजवावेत, रेल्वेतून खाद्यपदार्थ फेकू नयेत, मार्गावर नियमित स्वच्छता करावी आदी सूचनाही अहवालात केल्या आहेत.

पाच वर्षांचा कालावधी उलटूनही या उपाययोजनांची अंमलबजावणी झाली नाही. मात्र, येत्या काही वर्षांत इथल्या मार्गांच्या रुंदीकरणाची आणि गाड्यांची संख्या वाढवण्याची सरकारची योजना आहे. गोंदिया-चंद्रपूर व नागपूर-नागभीड रेल्वेमार्गांचे रुंदीकरण, सोबतच विद्युतीकरण आणि दुहेरीकरणाचे काम केले जाणार आहे, याकडे वन्यजीव संरक्षणासाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थेने लक्ष वेधले आहे.

**स्रोत -** पंकज मोहरीर. 'चंद्रपुरातील वन्यजीवांचा कॉरिडॉर असुरक्षित! रेल्वे अपघात वाढले, ५ वर्षांपूर्वीचा अहवाल धूळ खात,' *marathi.indiatimes.com*, २९.११.२०२३.

## पश्चिम महाराष्ट्र

### पुणे विभागात वन्य प्राणी बेकायदा पाळल्याप्रकरणी गेल्या पाच वर्षांत कारवायांतून २,३११ प्राणी जप्त

गेल्या पाच वर्षांत पुण्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवायांतून कायद्याने पाळण्यास बंदी असलेले २,३११ वन्य प्राणी ताब्यात घेतले.

जप्त केलेल्या प्राण्यांमध्ये बिबट्याच्या बछड्यासह, रानमांजर, खवलेमांजर, भेकर, सरिसृप गटातील प्राणी आणि विविध पक्षी आदी सुमारे ६५० वन्य प्राण्यांचा समावेश आहे. परदेशी प्रजातींसह भारतीय

जंगलांमधील वन्य प्राण्यांची तस्करी आणि खरेदी-विक्रीच्या छुप्या व्यवहारांत वाढ झाल्याचे प्रशासनाला आढळले आहे.

प्रशासकीय यंत्रणा माहिती मिळाल्यास धडक मोहिमा राबवून वन्य प्राण्यांचा बेकायदा व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करते आहे. तस्करी रोखण्यासाठी वन विभागही प्रयत्नशील आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये पकडलेले, शिकार केलेले वन्य प्राणी तस्करीसाठी पुण्यामार्गे विविध ठिकाणी पाठवले जात असल्याचे यंत्रणेला दिसून आले आहे. प्रामुख्याने कासवे, शेकरू, माकडे, विविध प्रकारचे पक्षी यांना देशविदेशात मागणी आहे. पाळण्यासाठी, खाण्यासाठी किंवा अंधश्रद्धेपोटी जादूटोण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. मुंगसाची शिकार त्याच्या केसांसाठी केली जाते. हरणे व रानडुकरांची मांसासाठी शिकार केली जाते. घुबडासह काही पक्ष्यांना पकडून जादूटोणा करण्यासाठी विकतात.

पुण्यातील कारवायांमध्ये नागरिकांच्या घरातही वन्य प्राणी आढळले आहेत. यातील बहुतांश घटनांमध्ये कायद्यानुसार भारतीय वन्य प्राणी पाळण्यावर बंदी असल्याची माहितीच नसल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. पाळीव प्राणी विकणाऱ्या दुकानदारांना कायद्याचे ज्ञान असूनही काही विक्रेते बेकायदा व्यवहार करत असल्याचे उघड झाले आहे. वन विभाग, पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागातर्फे पुण्यातील अशा छुप्या उद्योगांवर कारवाई करण्यात येत आहे.

ताब्यात घेतलेले वन्य प्राणी 'रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट'च्या उपचार केंद्रात आणले जातात. त्यांची वैद्यकीय तपासणी करून वन विभागाच्या आदेशानुसार त्यांना निसर्गात सोडण्याचा निर्णय घेतला जातो. परदेशी वन्य प्राण्यांना त्यांच्या मूळ अधिवासात सोडण्याचे निकष आणि प्रक्रिया प्रदीर्घ असते. 'रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट'कडे पुण्यासह नाशिक, सोलापूर, सातारा, सांगलीमधून वन विभागाने ताब्यात घेतलेले वन्य प्राणीही दाखल झाले आहेत.

सर्वसामान्य नागरिक वन्यजीव संवर्धन कायद्याबद्दल अनभिज्ञ आहेत. आपण घरात पाळलेला प्राणी संरक्षित असल्याची अनेकांना माहिती नसते. त्यामुळे व्यापक स्तरावर जनजागृतीची गरज आहे, असे 'रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नेहा पंचमिया यांनी सांगितले.

उत्साहाने विकत आणलेल्या प्राण्यांची देखभाल करणे अनेकांना जमत नाही. काही घटनांमध्ये प्राणी मरतात किंवा नागरिक सार्वजनिक ठिकाणी त्यांना सोडून देतात. परिणामी स्थानिक वन्यजीवांचे नुकसान होते, असेही ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

वेगवेगळ्या कारवायांत ताब्यात घेतलेल्या पक्ष्यांमध्ये रोझ रिंग्ड, प्लम हेडेड, अॅलेक्झांड्रिन आदी पॅराकिट्सची – ज्यांना सामान्यतः पोपट म्हणतात - संख्या जास्त आहे. तसेच, वेगवेगळ्या प्रजातीची घुबडे व घारींचाही त्यात समावेश आहे.

वन्य प्राण्यांमध्ये चौशिंगा, भेकर, काळवीट, खवलेमांजर, वेगवेगळ्या प्रकारातील वानरे, रानमांजर, लांडगे, कोल्हे, साळींदर आढळून आले. एकूण कारवायांमध्ये सरपटणाऱ्या प्राण्यांची संख्या सर्वाधिक असून त्यात विषारी, बिनविषारी साप व कासवाच्या भारतातील दुर्मीळ प्रजातींचा समावेश आहे.

| वर्ष | कारवाईत ताब्यात घेतलेले वन्य प्राणी | | |
|---|---|---|---|
| | भारतीय प्रजाती | परदेशी प्रजाती | एकूण |
| २०१९ | ८ | २ | १० |
| २०२० | २९ | ६ | ३५ |
| २०२१ | ३३८ | १,५०९ | १,८४७ |
| २०२२ | १३२ | ६० | १९२ |
| २०२३ (नोव्हेंबरपर्यंत) | १५७ | ७० | २२७ |
| एकूण | ६६४ | १,६४७ | २,३११ |

**स्रोत** - चैत्राली चांदोरकर. 'वन्य प्राणी तस्करीचे लोण पुण्यापर्यंत; ५ वर्षांत कारवाईतून २,३११ वन्यप्राणी ताब्यात,' *marathi.indiatimes.com*, ०३.१२.२०२३.

## पुणे विभागातून परदेशी वन्य प्राणी व्यावसायिकांचे जवळपास एक हजार नोंदणी अर्ज

परदेशी वन्य प्राण्यांची खरेदीविक्री करणाऱ्या व्यावसायिकांना सरकार दरबारी नोंदणी करणे बंधनकारक केल्यामुळे गेल्या तीन वर्षांत पुणे विभागातून ९८९ अर्ज वन विभागाकडे दाखल झाले आहेत. यात वर्ष २०२३ मधील १४३ अर्जांचा समावेश आहे.

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाने २०२० मध्ये परदेशातून आयात केलेल्या प्राण्यांच्या खरेदीबाबत सर्व कागदपत्रांचा दस्तावेज अर्जासह ‘परिवेश’ या संकेतस्थळावर टाकणे बंधनकारक केले आहे. नोंदणी प्रक्रिया आणि नियमावलीची सर्व माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोविड साथीच्या काळातील टाळेबंदी, संकेतस्थळावरील तांत्रिक अडथळे आणि जनजागृतीअभावी सुरुवातीचे एक वर्ष प्रशासनाने नोंदणी प्रक्रिया शिथील केली होती. मात्र, वर्ष २०२२ पासून मंत्रालयाने अंमलबजावणी सुरू केली. विक्रेत्यांबरोबरच परदेशी प्राणी पाळणाऱ्यांनाही माहिती देणे बंधनकारक आहे. राज्यनिहाय वन विभागाच्या सर्व कार्यालयांत ही माहिती संकलित होत असून, त्यांच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष दुकानांमध्ये, प्राणी पाळणाऱ्यांच्या घरी जाऊन तपासणी सुरू केली आहे.

वन्यजीव संवर्धनासाठी जागतिक पातळीवर कार्यरत ‘कन्व्हेन्शन ऑन इंटरनॅशनल ट्रेड इन एन्डेजर्ड स्पीशिज’ (CITES) ने जाहीर केलेल्या संकटग्रस्त वन्य प्राण्यांच्या यादीतील प्राणी पाळण्यावर भारतानेही बंदी घातली आहे.

पूर्वी परदेशातून विनापरवाना आणलेले वन्य प्राणी विमानतळावर पकडल्यास, संबंधितांवर कारवाई करून हे प्राणी वन विभागाच्या अधिकृत स्वयंसेवी संस्थांच्या ताब्यात दिले जात होते. मात्र, या प्राण्यांचे पुढे काय करायचे, हा मोठा प्रश्न होता. प्रशासनाच्या नव्या धोरणानुसार आता विमानतळावर पकडलेले बेकायदा प्राणी ज्या देशातून आणले, त्याच देशात परत पाठवले जातात. देशांतर्गत कारवाईतील प्राणी मात्र ताब्यात घेतात. त्यामुळे ‘परिवेश’वरील नावनोंदणी महत्त्वाची आहे, असे मानद वन्यजीव रक्षक आदित्य परांजपे यांनी सांगितले.

**स्रोत** - चैत्राली चांदोरकर. ‘वन विभागाची व्यावसायिकांवर करडी 'नजर'; वन्य प्राण्यांसंबंधी सरकार दरबारी नोंद करणे बंधनकारक,’ *marathi.indiatimes.com*, ०७.१२.२०२३.

## माणूस-वाघ संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| गडचिरोली | गडचिरोली | वाकडी जंगल परिसरात सरपण गोळा करणाऱ्या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू | लोकसत्ता ०३.०१.२०२४ |
| | | कुनघाडा वनपरिक्षेत्रातील नवेगाव शिवारात झाडू बनवण्याचे गवत कापण्यासाठी जंगलात गेलेल्या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू | लोकसत्ता १५.१२.२०२३ |
| चंद्रपूर | नागभीड | चांदा फोर्ट – गोंदिया रेल्वे मार्गावर किटाळीमेंढा इथे रेल्वेच्या धडकेत वाघाचा मृत्यू | लोकसत्ता २७.११.२०२३ |
| | ब्रह्मपुरी | तळोधी बाळापूर वनपरिक्षेत्रात शेतातील विहिरीत पडून वाघाचा मृत्यू | लोकसत्ता २४.१२.२०२३ |
| | | एका आठवड्यात बेलारा, खडसांगी, हळदा इथे वाघाच्या हल्ल्यात तिघांचा मृत्यू; परिसरातून लागोपाठ दोन वाघ जेरबंद | लोकसत्ता ०६.११.२०२३ |
| | वरोरा | खंबाडा - मुराडगाव रस्त्यावर वाहनाच्या धडकेत वाघिणीचा मृत्यू | लोकसत्ता ११.१२.२०२३ |
| | सिंदेवाही | सिंदवाही वनपरिक्षेत्रात शिकारीच्या उद्देशाने शेताच्या वीजप्रवाह सोडलेल्या कुंपणाच्या तारेचा स्पर्श झाल्यामुळे विजेच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू | लोकसत्ता २१.१२.२०२३ |

## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| अमरावती | अमरावती | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात मृत बिबट्या | लोकसत्ता १७.१२.२०२३ |
| अहमदनगर | पाथर्डी | परिसरात वर्षभरातील तिसरा बिबट्या नवले मळयात जेरबंद | सकाळ २८.१२.२०२३ |
| औरंगाबाद | गंगापूर | वाळूजलगत लांझी हिरापूर शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात बोकड ठार व शेळी जखमी | सकाळ १३.१२.२०२३ |
| चंद्रपूर | गोंडपिंपरी | वेजगाव परिसरात बिबट्या जेरबंद. | सकाळ ०८.१२.२०२३ |
| | भद्रावती | जिल्ह्यात 'बिबट समस्या मुक्त ग्राम योजना' राबवण्याच्या मागणीसाठी जुनोना इथे आंदोलन | लोकमत १३.१२.२०२३ |
| धुळे | धुळे | देऊर खुर्द इथे बिबट्या जेरबंद. | सकाळ २३.११.२०२३ |
| नाशिक | नाशिक | मखमलाबाद इथे शिकार केलेली गाय घेऊन रस्ता ओलांडत असताना वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | महाराष्ट्र टाइम्स २७.१२.२०२३ |
| | सिन्नर | नायगाव खोऱ्यात वन विभागाच्या 'बिबट्या शोधा व पकडा' मोहिमेत सहावा बिबट्या जेरबंद | सकाळ ०६.१२.२०२३ |
| नंदुरबार | तळोदा | खेडले – धानोरा रस्त्यावर वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | लोकमत ०२.१२.२०२३ |
| | शहादा | शहादा शहरातील रुग्णालयात बिबट्या शिरला | लोकमत १२.१२.२०२३ |
| पालघर | पालघर, डहाणू | चिंचणी, बावडा, तारापूर, कोळगाव परिसरात बिबट्याचा वावर; एका लहान मुलासह पाळीव जनावरांवर हल्ले | लोकसत्ता ०४.१२.२०२३ |
| पुणे | आंबेगाव | काठापूर गावात दुचाकीवरून जाणारी महिला बिबट्याच्या हल्ल्यात जखमी | लोकमत १७.११.२०२३ |
| | जुन्नर | आळे गावात साधारण महिनाभरात चौथा बिबट्या जेरबंद | सकाळ २०.११.२०२३ |
| बुलढाणा | बुलढाणा | देऊळघाट इथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतमजूर जखमी | लोकसत्ता ०२.१२.२०२३ |
| रत्नागिरी | गुहागर | नरवण इथे विहिरीत पडलेल्या बिबट्याची वन विभागाने केली सुटका | महाराष्ट्र टाइम्स ०७.१२.२०२३ |
| सातारा | कराड | गमेवाडी इथे बोडका शिवारातील विहिरीत बिबट्याचा बछडा पडला | सकाळ ०२.१२.२०२३ |



## आंतरराज्यीय बातम्या

महाराष्ट्र/ओदिशा

**महाराष्ट्रातील वाघ २००० किलोमीटर चालून ओदिशात**



चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी वन क्षेत्रातील वाघ २,००० किलोमीटर अंतर चालून ओदिशात पोहोचला आहे. या वाघाने चार राज्यांतून प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्याने नदीनाले, शेते, महामार्ग इत्यादी ओलांडले.

या वाघाला रेडिओ-कॉलर लावलेली नव्हती. मात्र, छायाचित्रांच्या आधारे त्याची ओळख पटवण्यात आली. ओदिशाच्या गजपती जिल्ह्यातील महेंद्र वन परिक्षेत्रात हा वाघ वनाधिकाऱ्यांना दिसला. तो नवीन असल्याचे त्यांना जाणवल्याने त्यांनी वाघाची छायाचित्रे घेऊन इतर तपशीलासह 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'कडे पाठवली. संस्थेतील वैज्ञानिकांनी ही छायाचित्रे संस्थेच्या संकलनात असलेल्या इतर वाघांच्या छायाचित्रांशी जुळवून पाहिली असता हा वाघ महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी वन क्षेत्रातील असल्याचे स्पष्ट झाले.

महाराष्ट्रात यापूर्वी 'वॉकर' नावाने प्रसिद्ध झालेला वाघ यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातून निघून १४ महिन्यांत ३,००० किलोमीटरपेक्षा जास्त अंतर चालून ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावला. मात्र, सध्या या वाघाचा ठावठिकाणा माहिती नसल्याचे वृत्तात नमूद केले आहे. तत्पूर्वी, नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर कोंढाळी भागातील 'नवाब' नावाच्या वाघाने अमरावती जिल्ह्यातील पोहरा मालखेडचे राखीव वन गाठले होते. उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यातील 'बली' नावाच्या वाघाने सरळ रेषेतील सुमारे १५० किलोमीटर अंतरावर असलेले मानसिंगदेव अभयारण्य गाठले होते. नागझिरा अभयारण्यातील अल्फा, जय या वाघांनी देखील स्थलांतर केले आहे.

महाराष्ट्रातील वाघाच्या ओदिशापर्यंतच्या प्रवासामुळे पुन्हा एकदा वाघांचे भ्रमणमार्ग आणि सुरक्षेचा मुद्दा समोर आल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – 'दोन हजार किलोमीटरचे अंतर पार करून ब्रह्मपुरी वन क्षेत्रातील वाघ ओदिशात,' *www.loksatta.com*, २५.११.२०२३.

## राष्ट्रीय बातम्या

**देशातील हत्तींच्या भ्रमणमार्गांविषयी अहवालात गंभीर त्रुटी; योग्य व्याख्येअभावी केली मोजणी**

केंद्र सरकारने प्रकाशित केलेल्या 'एलिफंट कॉरिडॉर्स ऑफ इंडिया २०२३' या अहवालातील गंभीर त्रुटींकडे हत्ती विषयक तज्ञ व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मधील प्राध्यापक रामन सुकुमार यांनी लक्ष वेधले आहे.


वर्ष २०१० पासून २०२३ पर्यंतच्या काळात देशात हत्तींच्या भ्रमणमार्गांची संख्या ६२ ने वाढून एकूण १५० इतकी झाल्याचे या अहवालात म्हटले आहे. मात्र, भ्रमणमार्गांची मोजणी करताना त्याची योग्य व्याख्याच लक्षात घेतलेली नाही, असे सुकुमार यांनी २९ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत सांगितले. योग्य व्याख्येअभावी भ्रमणमार्ग घोषित केल्यामुळे येत्या काळात हत्ती माणूस संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होईल आणि न्यायिक खटल्यांचेही प्रमाण वाढेल, असा धोक्याचा इशारा त्यांनी दिला आहे. बैठकीतील चर्चेच्या नोंदींमध्ये ही बाब समोर आली आहे.

अहवालात अधिवास आणि विस्तीर्ण भूभागांचा भ्रमणमार्गांमध्ये समावेश केल्याचे सुकुमार यांनी बैठकीत सांगितले. त्याची अनेक उदाहरणे त्यांनी दिली. कर्नाटकात एक ते दोन किलोमीटर लांबीच्या दहाच्या पटीतील हेक्टर क्षेत्राला भ्रमणमार्ग म्हटले आहे; तर झारखंडमध्ये १२० किमी लांब व ५ किमी रूंद अशा विस्तीर्ण पट्ट्याला भ्रमणमार्गाचा दर्जा दिला आहे. त्याचे ६०० चौ. किमी क्षेत्रफळ देशातील कोणत्याही संरक्षित क्षेत्राच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त असल्याकडे सुकुमार यांनी लक्ष वेधले.

झारखंडमधील अन्य एक भ्रमणमार्ग म्हणून ४६ किमी लांब मात्र अवघे ३० मीटर रूंद क्षेत्र घोषित केले आहे. या क्षेत्रातून हत्तींचा कळप गेला तर त्याला एका रांगेत चालावे लागेल. ओदिशातील एक भ्रमणमार्ग ७५ किमी लांब आहे.

ओदिशा व झारखंड जवळ असलेल्या पश्चिम बंगालमधील मयुरझिरना सारख्या परिसरात जमिनीचे अवघे काही वनाच्छादित तुकडे हत्तींसाठी सुस्थितीत आहेत; दक्षिणेकडील इतर भाग माणसाच्या सातत्यपूर्ण वावराची शेतजमीन आहे. इथून हत्ती बाणकुरा, पूर्व व पश्चिम मिदनापूर व बांग्लादेशातही जातात. हे सर्व भाग हत्तींच्या इतर अधिवासांशी जोडण्याची शिफारस अहवालात केली आहे.

मात्र, मुळात भ्रमणमार्गाच्या व्याख्येत ही कल्पनाच बसत नाही, असे सुकुमार यांनी सांगितले. अशा प्रकारच्या अशक्य म्हणता येतील अशा सूचना अहवालात केल्याचे ते म्हणाले.



**स्रोत** – हिमांशु नितनवरे. 'Elephant corridor report plagued with inconsistencies, could escalate conflict with humans, says expert,' *www.downtoearth.org.in*,०२.११.२०२३.

### देशातील व्याघ्रमृत्युंच्या वार्षिक आकडेवारीच्या सरकारी व बिगर सरकारी नोंदींमध्ये तफावत

सरकारी आणि बिगरसरकारी संस्थांनी दिलेल्या देशातील वाघांच्या मृत्यूच्या आकडेवारीत तफावत दिसून आली आहे. दोन प्रकारच्या संस्थांच्या आकडेवारीत ३३ व्याघ्रमृत्युंची तफावत आहे; सरकारी संस्थांनी जाहीर केलेला आकडा कमी आहे.

'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण' अर्थात नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी (NTCA) च्या संकेतस्थळावर वर्षभरात देशात १६८ वाघांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. 'वाइल्डलाईफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ इंडिया' (WPSI) संस्थेच्या संकेतस्थळावर २०१ वाघांचा देशात वर्षभरात मृत्यू झाल्याचे म्हटले आहे.

**स्रोत** – 'वाघांच्या मृत्यूबाबतच्या आकडेवारीत तफावत; 'एनटीसीए' आणि 'डब्ल्यूपीएसआय'कडे वेगवेगळ्या नोंदी,' *www.loksatta.com*, २७.१२.२०२३.

### गेल्या दशकातील सर्वाधिक व्याघ्रमृत्यू २०२३ मध्ये; महाराष्ट्रात प्रथमच सर्वाधिक व्याघ्रमृत्युंची नोंद

भारतात वर्ष २०२३ मध्ये १७७ वाघांचा मृत्यू झाला. त्यापैकी सर्वाधिक – ४५ व्याघ्रमृत्यू महाराष्ट्रात झाले आहेत. महाराष्ट्रापाठोपाठ मध्य प्रदेशात ४०, कर्नाटक, केरळ व तमिळ नाडू या राज्यांमध्ये प्रत्येकी १४ वाघांचा मृत्यू झाला आहे.

तसेच, २०२३ हे वर्ष मागील १२ वर्षांतील सर्वाधिक व्याघ्रमृत्यूंचे वर्ष ठरले आहे. यापूर्वीच्या १२ वर्षांत सर्वाधिक - १२७ व्याघ्रमृत्यू वर्ष २०२१ मध्ये झाले होते. मागील पाच वर्षांत देशात ६२७ व्याघ्रमृत्युंची नोंद झाली आहे.

वर्षनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे -

| वर्ष | व्याघ्रमृत्यू |
|---|---|
| २०१९ | ९६ |
| २०२० | १०६ |
| २०२१ | १२७ |
| २०२२ | १२१ |
| २०२३ | १७७ |
| एकूण | ६२७ |

**स्रोत** – 'देशाने गमावले १७७ वाघ; मागील १२ वर्षांतील सर्वाधिक मृत्यू, कोणत्या राज्यात प्रमाण अधिक?' *marathi.indiatimes.com*, ०१.०१.२०२४.

महाराष्ट्रातील व्याघ्रमृत्युंची सरकारी आकडेवारी पान क्र. २१, २२ वर पाहा.
स्रोत - https://ntca.gov.in/tiger-mortality/#1696

| क्र. | तारीख | लिंग | वय | व्याघ्र प्रकल्प | व्याघ्र प्रकल्पाच्या आत किंवा बाहेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०३.०१.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| २ | १२.०१.२०२३ | अज्ञात | प्रौढ | पेंच व्याघ्र प्रकल्प (MH) | आत |
| ३ | १३.०१.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| ४ | १५.०१.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| ५ | २८.०१.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| ६ | ०६.०२.२०२३ | अज्ञात | अज्ञात | - | बाहेर |
| ७ | ११.०२.२०२३ | पुरुष | उप-प्रौढ | - | बाहेर |
| ८ | २६.०२.२०२३ | पुरुष | प्रौढ | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | आत |
| ९ | ०५.०३.२०२३ | अज्ञात | प्रौढ | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | आत |
| १० | २४.०३.२०२३ | स्त्री | शावक | - | बाहेर |
| ११ | २५.०३.२०२३ | स्त्री | - | - | बाहेर |
| १२ | २६.०३.२०२३ | पुरुष | प्रौढ | नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प | आत |
| १३ | ०१.०४.२०२३ | अज्ञात | शावक | - | बाहेर |
| १४ | ०२.०४.२०२३ | अज्ञात | अज्ञात | - | बाहेर |
| १५ | २९.०४.२०२३ | पुरुष | प्रौढ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प | आत |
| १६ | ०५.०६.२०२३ | - | - | - | बाहेर |
| १७ | ०७.०६.२०२३ | - | - | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प | आत |
| १८ | ०६.०६.२०२३ | स्त्री | प्रौढ | नागरहोल व्याघ्र प्रकल्प | आत |
| १९ | २१.०६.२०२३ | अज्ञात | शावक | - | बाहेर |
| २० | २५.०६.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| २१ | २९.०६.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| २२ | २०.०७.२०२३ | स्त्री | उप-प्रौढ | - | बाहेर |
| २३ | २९.०७.२०२३ | स्त्री | उप-प्रौढ | - | बाहेर |
| २४ | ३१.०७.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| २५ | ११.०८.२०२३ | पुरुष | उप-प्रौढ | नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प | आत |
| २६ | १६.०८.२०२३ | - | प्रौढ | - | बाहेर |
| २७ | १९.०८.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| २८ | ०३.०९.२०२३ | - | शावक | पेंच व्याघ्र प्रकल्प | आत |
| २९ | ०३.०९.२०२३ | - | शावक | पेंच व्याघ्र प्रकल्प | आत |
| ३० | ०७.०९.२०२३ | पुरुष | शावक | - | बाहेर |

| क्र. | तारीख | लिंग | वय | व्याघ्र प्रकल्प | व्याघ्र प्रकल्पाच्या आत किंवा बाहेर |
|---|---|---|---|---|---|
| ३१ | ०७.०९.२०२३ | - | शावक | - | बाहेर |
| ३२ | १२.०९.२०२३ | पुरुष | उप-प्रौढ | - | बाहेर |
| ३३ | ०२.१०.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| ३४ | ११.१०.२०२३ | स्त्री | उप प्रौढ | - | बाहेर |
| ३५ | २४.१०.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| ३६ | २६.१०.२०२३ | स्त्री | उप-प्रौढ | - | बाहेर |
| ३७ | ०१.११.२०२३ | स्त्री | शावक | - | बाहेर |
| ३८ | २७.११.२०२३ | स्त्री | शावक | - | बाहेर |
| ३९ | १४.११.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| ४० | ३०.११.२०२३ | स्त्री | उप-प्रौढ | - | बाहेर |
| ४१ | १०.१२.२०२३ | स्त्री | प्रौढ | - | बाहेर |
| ४२ | १६.१२.२०२३ | पुरुष | प्रौढ | - | बाहेर |
| ४३ | २१.१२.२०२३ | पुरुष | उप-प्रौढ | - | बाहेर |
| ४४ | २४.१२.२०२३ | पुरुष | शावक | - | बाहेर |
| ४५ | २५.१२.२०२३ | - | - | - | बाहेर |

## देशातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासासाठी आणखी ११ प्रशिक्षित कुत्रे

वन्यजीवांसंदर्भातील गुन्ह्यांच्या तपासासाठी महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पासह देशभरातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये प्रशिक्षित कुत्रे तैनात केले जाणार आहेत. हरयाणातील पंचकुला इथल्या ‘बेसिक ट्रेनिंग सेंटर – इंडो-तिबेटन बॉर्डर पोलीस फोर्स’मध्ये ११ कुत्रे आणि त्यांना हाताळणाऱ्या २२ व्यक्तींना प्रशिक्षण दिले जात आहे.

‘WWF इंडिया’ आणि ‘TRAFFIC’ या संस्थांच्या सहयोगाने हा उपक्रम राबवला जात आहे. त्यामुळे वन्यजीवांबाबत गुन्ह्यांच्या तपासासाठी असलेल्या कुत्र्यांची संख्या १०५ होणार आहे. ‘बेल्जिअन मालिनॉईस’ प्रकारचे सहा ते नऊ महिने वयाचे कुत्रे आणि त्यांना हाताळणाऱ्या व्यक्ती सात ते आठ महिने प्रशिक्षण घेत आहेत.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या कुत्र्यांना महाराष्ट्रातील पेंच, उत्तराखंडातील कॉर्बेट व राजाजी, झारखंडमधील पलामू, ओदिशातील सिमिलीपाल, छत्तीसगडमधील अचानकमार, पश्चिम बंगालमधील बक्सा या व्याघ्र प्रकल्पांमध्ये तैनात केले जाणार आहे.

पोलीस खात्यात अंमली पदार्थ आणि स्फोटकांचा शोध घेण्यासाठी प्रशिक्षित कुत्र्यांची मदत घेतली जाते. त्याचप्रमाणे कुत्र्यांच्या तीक्ष्ण घ्राणेंद्रियाच्या आधारे त्यांना प्रशिक्षित केल्यावर वन्य जीवांबाबत गुन्ह्याच्या तपासात त्यांची मदत घेता येते.

कुत्र्यांना प्रशिक्षण देण्याचा हा उपक्रम २००८ मध्ये दोन कुत्र्यांना घेऊन सुरू करण्यात आला. वर्ष २०२२ अखेरीस या कार्यक्रमांतर्गत ९४ प्रशिक्षित कुत्रे वन विभागात सामील करून घेण्यात आले, सहयोगी संस्थांच्या अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

**स्रोत** – ‘व्याघ्र प्रकल्पांतील गुन्ह्यांच्या शोधासाठी श्वानपथक; हरियाणातील पंचकुला येथे प्रशिक्षण सुरू,’ www.loksatta.com, २४.११.२०२३.



## आंतरराष्ट्रीय बातम्या

### हवामान बदलामुळे सागरी जीवांचे ‘उष्ण कटिबंधीकरण’; शोधनिबंधातील निष्कर्ष

हवामान बदलामुळे महासागरात होत असलेल्या तापमानवाढीचा परिणाम म्हणून उष्ण कटिबंधातील सागरी प्रजाती विषुववृत्ताकडून ध्रुवाच्या दिशेने सरकत आहेत; तर समशीतोष्ण कटिबंधातील प्रजाती मागे हटत आहेत. या प्रजातींना अधिवासात स्पर्धा निर्माण झाली असून नवीन शिकारी प्रजातीही अधिवासात आल्याने धोका निर्माण झाला आहे. ‘ट्रेंड्स इन इकॉलॉजी अँड इवोल्यूशन’ या विज्ञानपत्रिकेत प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधात ही निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत.

सागरी जीवसृष्टीच्या मोठ्या प्रमाणात होत असलेल्या या स्थलांतराला संशोधकांनी ‘उष्ण कटिबंधीकरण’ (tropicalisation) असे म्हटले आहे. ही प्रक्रिया सर्वप्रथम भूमध्य समुद्रात दिसून आली होती. उष्ण कटिबंधातील प्रजातींच्या अस्तित्वामुळे या समुद्राला उष्ण कटिबंधीकरणाचा ‘हॉटस्पॉट’ म्हटले जात आहे.

वेगवेगळ्या कटिबंधातील प्रजाती एकत्र आल्यावर त्यांचे खाद्य आणि वर्तनात बदल होत असल्याचे निरीक्षण संशोधकांनी नोंदवले आहे; उदाहरणार्थ – हद्दीची व्याप्ती वाढवून मेक्सिकोतील बाजा कॅलिफोर्निया बेटाजवळ आलेल्या उष्ण कटिबंधातील भक्षक प्रजातींपासून स्वसंरक्षणासाठी समशीतोष्ण कटिबंधातील वोल्कॅनो बारनॅकल्स या प्रजातीने स्वत:ला वक्राकार केले आहे; तर उष्ण कटिबंधातील डॅमसेल मासे आणि समशीतोष्ण कटिबंधातील रीफ मासे हे सहअस्तित्त्व साध्य करण्यासाठी आपले खाद्य आणि सामाजिक वर्तनात बदल करत आहेत.

**स्रोत** – ‘सागरी जिवांची धाव ध्रुवाकडे,’ *marathi.indiatimes.com*, ३०.११.२०२३.


---


**AVAILABLE AT 25% DISCOUNT**

The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra
News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by

Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




**Contents:**

**- Editor’s Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner’s perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (ShibaDesor); 4)Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line-drawings by Ashvini Menon

**For copies at 25% discount write to** psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## मुंबईतील बिबटे

बिबट्या हा प्राणी भारतात सर्वत्र आढळून येतो. मैदानी भागातील घनदाट जंगले आणि दऱ्याखोऱ्यांपासून ते थेट हिमालयापर्यंत त्याचा वावर आहे. गेल्या दशकातील संशोधनातून बिबटे हे शेतशिवारांबरोबरच जयपूर, बेंगळूरु आणि मुंबईसारख्या शहरांजवळील दाट लोकवस्तीच्या भागातही राहात असल्याच्या नोंदी झाल्या आहेत. भारतातील ८३% बिबटे हे संरक्षित क्षेत्राच्या बाहेर राहतात. असाच एक अधिवास म्हणजे मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्याना- (SGNP) -लगतचा परिसर.

अत्यंत दाट लोकवस्तीमुळे आगळयावेगळ्या ठरणाऱ्या इथल्या अधिवासातील बिबटे आणि माणसांचे परस्परसंबंध समजून घेण्यासाठी रेडिओ-टेलिमेट्री तंत्रज्ञानाचा वापर २०२१ साली प्रथमच केला. 'महाराष्ट्र वन विभाग' आणि 'वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन सोसायटी-इंडिया' यांनी सहयोगाने संशोधन प्रकल्प राबवला.

मुंबईत रेडिओ-कॉलर लावलेल्या बिबट्यांचा इतिहास अवघा दहा वर्षांचा आहे. २००९ या वर्षात रेडिओ-कॉलर लावलेला 'आजोबा' नावाचा नर बिबट्या माळशेज घाटातून जवळपास १२० किलोमीटर अंतर चालून SGNP इथे पोहोचला होता.

बिबट्यांना लावलेल्या रेडिओ-कॉलरमुळे आम्हाला पुढील काही लक्षवेधी बाबी आढळून आल्या.

- मादी बिबट्यांच्या हद्दीचे क्षेत्र हे नर बिबट्यांच्या तुलनेत कमी असते. सर्वांत लहान क्षेत्र - L36 असे नाव दिलेल्या मादी बिबट्याचे २.५८ चौ. किमी तर सर्वांत मोठे क्षेत्र - ८४.२६ चौ. किमी (९५% MCP अर्थात मिनिमम कॉन्वेक्स पॉलिगॉननुसार, बिबट्याच्या वावराच्या नोंदींच्या सर्व बिंदूंना सामावून घेणारा व सर्व अंतर्गत कोन १८० अंशापेक्षा कमी असलेल्या बहुभुजाकृतीचे क्षेत्रफळ) हे L93 या नर बिबट्याचे असल्याचे आढळले. भारतातील इतर ठिकाणांच्या तुलनेत इथल्या बिबट्यांच्या हद्दीचे क्षेत्र हे लहान असल्याचे दिसून आले. भक्ष्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याने कदाचित असे झाले असावे.
- या अभ्यासात एकाच क्षेत्रात वेगवेगळ्या बिबट्यांचा वावर असल्याचे आढळून आले. L126 या बिबट्याच्या हद्दीत जास्तीतजास्त नऊ बिबट्यांच्या नोंदी मिळाल्या.
- इथल्या बिबट्यांच्या आहारात मुख्यत्त्वे SGNPच्या परिघावर सर्वत्र उपलब्ध असलेल्या पाळीव प्राण्यांचा समावेश असल्याचे दिसून आले. कॉलर लावलेल्या पाचही बिबट्यांच्या मिळून ९७ शिकारींची नोंद केली, ज्यातील सुमारे ७५% नोंदीत भटके किंवा पाळीव कुत्रे, मांजरी, शेळ्या आदी प्राणी भक्ष्य असल्याचे आढळले. याखेरीज बिबटे चितळ, सांबराची शिकार करतानाही आढळून आले.

राष्ट्रीय उद्यानाच्या परिघावर सहज उपलब्ध असलेल्या खाद्यावर ताव मारतानाच बिबटे माणसांशी आमनासामना जाणीवपूर्वक कशाप्रकारे टाळतात, हे समजून घेण्यात आम्हाला पुरेपूर यश मिळाले. आम्हाला असे आढळले की हे बिबटे दिवसा जंगलाच्या आतील भागात आराम करतात आणि रात्रीच्या वेळेस जेव्हा लोकवस्तीत शुकशुकाट असतो तेव्हा तिथले भटके कुत्रे, मांजरी, उंदीर इत्यादी प्राण्यांची शिकार करण्यास बाहेर पडतात. कित्येक वेळा असेसुद्धा आढळून आले की आम्ही ज्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहोत असे बिबटे माणसांच्या अगदी जवळ असत पण माणसांना त्यांची चाहूल नसे. अशाप्रकारे परिस्थितीशी जुळवून घेत व उपलब्ध असलेल्या खाद्याचा पुरेपूर वापर करत हे बिबटे SGNP लगत असलेल्या दाट लोकवस्तीच्या आजूबाजूला कोणालाही इजा न करता वावरतात.

- **निकित सुर्वे**

प्रमुख, ह्युमन वाइल्डलाईफ इंटरॅक्शन्स अँड अर्बन बायोडायवर्सिटी प्रोग्राम, वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन सोसायटी – इंडिया

(nikitsurve@wcsindia.org)

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004